# नाईकनवरे डेव्हलपर्सतर्फे ईगल्स नेस्ट गृहप्रकल्प सादर

■ पुणे :

आघाडीची रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कंपनी असलेल्या नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे तळेगाव येथे ईगल्स नेस्ट हा नवीन गृहप्रकल्प सादर करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन शनिवार दि.२४ ऑगस्ट रोजी करण्यात आले.याप्रसंगी नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि.चे अध्यक्ष डी. पी. नाईकनवरे, श्रीमती लता नाईकनवरे,कंपनीचे संचालक हेमंत व रणजित नाईकनवरे तसेच एचडीएफसी बँकेचे असिस्टंट जनरल मॅनेजर (बिझिनेस डेव्हलपमेंट) कार्तिक अय्यर व वडगाव-मावळ येथील माजी आमदार कृष्णराव भेगडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हा प्रकल्प वडगाव मावळ येथे एका बाजूला हिरवीगार वनराई आणि दुसऱ्या बाजूला इंद्रायणी नदीच्या सुंदर खोऱ्यामध्ये विकसित करण्यात आला आहे.हिरव्यागार टेकड्या,धबधबे व सर्वदूर पसरलेल्या वनराईने युक्त अशा स्वप्नवत परिसरात स्थित ईगल्स नेस्ट हा गृह प्रकल्प पुण्यापासून अवघ्या ३५-४० किमी अंतरावर आहे.टाऊन हाऊसेस,रो हाऊसेस,डुप्लेक्स अपार्टमेंटस,२ व ३ बीएचके अपार्टमेंटस् व सीझन्स रिसॉर्ट क्लब अशा वैविध्यपूर्ण उपलब्धतता सादर करणारा ईगल्स नेस्ट गृहप्रकल्प म्हणजे खऱ्या अर्थाने आपलं घरं म्हणावे असा सिध्द होणारा आहे.

या नवीन प्रकल्पाबाबत बोलताना नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि.चे संचालक हेमंत नाईकनवरे म्हणाले की,हा प्रकल्प दोन टप्प्यांत पुर्ण करण्यात येणार आहे.एकूण ४५ एकर जागेत विस्तारलेल्या या प्रकल्पाचा पहिला टप्पा १२ एकरांचा असेल.या टप्प्यामध्ये एकूण ९५ युनिटस् विकसित केले जाणार असून त्यामध्ये ३बीएचके चे ४० युनिटस्,टाऊन हाऊसेसचे ३२,रो हाऊसेसची ७ व डुप्लेक्सची १६ युनिटस् असणार आहेत.सदर प्रकल्प निसर्गाच्या सानिध्यात राहण्याचा अनुभव देणाऱ्या सीझन्स रिसॉर्ट क्लबची सुविधा उपलब्ध करून देत असून यामध्ये क्लबहाऊस, हेल्थकेअर सेंटर, मल्टीपर्पज कोर्ट, पार्टी लॉन्स, ॲम्फिथिएटर, कीडस् प्ले एरिया, रेस्टॉरंट व बार यांसारख्या सुविधा असणार आहेत.

ते पुढे म्हणाले की,३५ आरामदायी खोल्यांचा समावेश असलेल्या रिसॉर्ट क्लबसह सीझन्स लीजर रिसॉर्ट ही मध्यवर्ती संकल्पना ठेवून त्याभोवती विविध प्रकारची घरे आरेखित करण्यात आली असून या प्रकल्पाची ही खासियत असणार आहे. सीझन्स लीझर रिसॉर्ट दोन स्वतंत्र भागांत आरेखित करण्यात आला असून डोंगरउतारावरील दोन्ही बाजूनी गर्द झाडी असलेल्या पाऊलवाटेने तो जोडण्यात आला आहे.यातील एका युनिटमध्ये मल्टीक्युझिन रेस्टॉरंट व लाउंज बार यांचा समावेश असेल.त्याचप्रमाणे येथे कॉन्फरन्स सुविधेसह कार्यक्रमांच्या पूर्वतयारीसाठी आरक्षित जागा व सेवा यांसह विशेष आरेखित आरामदायी हॉल,कौटुंबिक सोहळे व व्यावसायिक सभा व सेमिनारसाठी उपलब्ध करण्यात येणार आहे.येथील रहिवाशांसाठी व्यायाम शाळा व स्पा,इनडोअर गेम रूम,स्क्वॅश कोर्ट व स्विमिंग पूल यांसह लॉजिंग व डायनिंगची सुविधा सवलतीच्या दरात प्रकल्पातील ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत.ते पुढे म्हणाले की,आधुनिक तंत्रज्ञानाचा बांधकामांमध्ये वापर करण्यामध्ये कंपनी पहिल्यापासूनच आघाडीवर राहिली आहे.ईगल्स नेस्ट प्रकल्प उभारतानाही कंपनीने उंच इमारतींसह पारंपारिक पध्दतीच्या कमी उंचीच्या इमारतींमध्ये वापरण्यासाठी खास विकसित केलेल्या ॲल्युफॉर्म तंत्रज्ञानाचा वापर केला असल्याचे त्यांनी नमूद केले.



हा प्रकल्प हिंजवडी आयटी पार्क, तळेगाव एमआयडीसी क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी सोयीचा ठरणारा असून निसर्ग व आधुनिक सोयी सुविधांचा आनंद एकत्रितरित्या देणाऱ्या घरांच्या शोधात असणाऱ्या पुणेकर व मुंबईकरांसाठी देखील हा प्रकल्प त्यांना हे समाधान देणारा ठरेल असा विश्वास नाईकनवरे यांनी व्यक्त केला.

शुभारंभ योजना म्हणून पहिल्या २५ नोंदणी करणाऱ्या ग्राहकांना ५ टक्के इतक्या सवलतीच्या दरात एचडीएफसी तर्फे कर्ज योजना देऊ केली आहे.या योजनेअंर्तगत हा सवलतीचा दर पहिल्या दोन वर्षांसाठी या ग्राहकांना मिळेल.शुभारंभ योजनेअंर्तगत ३ बीएचके सदनिकांसाठी ३२०० रूपये प्रति स्के.फीट,रो हाऊसेससाठी ३७५० रूपये प्रति स्के.फीट,टाऊन हाऊसेससाठी ४००० रूपये प्रति स्के.फीट आणि डुप्लेक्ससाठी ३४०० रूपये प्रति स्के.फीट दर लागू होणार असल्याचे त्यांनी सांगितले.